# प्रार्थना

हे ईश्वरा ! वास्तविक, ही परिस्थितीची विडंबना आहे की, माझे जीवन दुसऱ्यांच्या आजारावर अवलंबून आहे.

परंतू, तरी सुद्धा हे माझे सौभाग्य आहे की, तू मला त्यांच्या कष्टाचे निवारण करण्याकरीता एक उत्तम संधी दिली आहेस. तू मला ही जबाबदारी पूर्ण करण्याची योग्यता देखील दिली आहेस.

हे ईश्वरा ! मला अशी शक्ती प्रदान कर की, मी माझे कार्य अत्यंत निष्ठेने पूर्ण करू शकेन. वास्तविक, तूच सर्व कष्टांचे निवारण करतोस आणि सर्व सुखांचा उगम देखील तूच आहेस. मी तर फक्त एक निमित्त-मात्र आहे.

हे ईश्वरा ! माझ्या रूग्णांवर कायमची कृपा-दृष्टी ठेव.